**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ०१ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या**

1. **व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर्सच्या दरात १९५ रुपयांची वाढ.**
2. **क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त शासनातर्फे विविध उपक्रम राबविले जाणार.**
3. **गडचिरोलीत काल नऊ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण; जिल्ह्यात केवळ सहा सशस्त्र नक्षलवादी शिल्लक असल्याची पोलीस अधीक्षकांची माहिती.**
4. **अमरावती, वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर या जिल्ह्यांत आज गारपिटीची शक्यता; वादळी पर्जन्यमानाचा नारिंगी इशारा जारी.**

-----------------------------------------------

**व्यावसायिक एलपीजी**

पश्चिम आशियातल्या अस्थिर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, तेल विपणन कंपन्यांनी देशातल्या महानगरांमध्ये व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर्सचे दर वाढवले आहेत. त्यामुळे दिल्लीत व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर्सचे किरकोळ दर आता २ हजार ७८ रुपये ५० पैसे, कोलकातामध्ये २ हजार २०८ रुपये, मुंबईत २ हजार ३१ रुपये तर चेन्नईमध्ये तो २ हजार २४६ रुपये ५० पैसे करण्यात आल्याची माहिती इंडियन ऑइल कोर्पोरेशनच्या वेबसाईटवर दिली आहे. १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचे सुधारित दर आजपासून लागू झाल्याचं यात म्हटलं आहे. देशात स्वयंपाकाच्या गॅसचे दर मात्र स्थिर आहेत. विमानासाठी वापरल्या जाणाऱ्या इंधनाच्या दरातही साडेआठ टक्के वाढ झाली आहे. तर परदेशी विमान कंपन्यांसाठी ही दरवाढ दुप्पट झाली आहे

-----------------------------------------------

**आंतरमंत्रालयीन बैठक**

पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशात बियाणे आणि इंधनाचा पुरेसा साठा असल्याचं केंद्र सरकारने स्पष्ट केलं आहे. नवी दिल्लीत झालेल्या आंतरमंत्रालयीन बैठकीत कृषी विभागाच्या अपर सचिव डॉ. मनिंदर कौर द्विवेदी यांनी खरीप हंगामासाठी १८५ लाख क्विंटलहून अधिक बियाणे उपलब्ध असल्याची

माहिती दिली. तसंच कृषी रसायनांचाही पुरेसा साठा असल्याचं त्यांनी सांगितलं. पेट्रोलियम मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी कच्च्या तेलाचा साठा आणि पुरवठा पुढील दोन महिन्यांसाठी सुरक्षित असल्याचं नमूद केलं.

-----------------------------------------------

**द्विशताब्दी जयंती**

11 एप्रिल 2026 ते 10 एप्रिल 2027 हा कालावधी क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांचं द्विशताब्दी जयंती वर्ष म्हणून साजरं करण्यात येणार आहे. या द्विशताब्दी वर्षानिमित्त त्यांचे कार्य, विचार पुढील पिढीपर्यंत प्रभावीपणे नेण्याची संधी असल्याचं सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्यावर आधारित कार्यक्रमांचं वर्षभर आयोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्रालयात आयोजित महात्मा जोतिराव फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे करण्यासाठी गठीत समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. महात्मा जोतिराव फुले यांचे मूळ गाव खानवडी येथील त्यांच्या स्मृती जपणाऱ्या जिल्हा परिषद शाळेचा कायापालट करण्यात आला आहे. या द्विशताब्दी जयंती वर्षाची सुरुवात 11 एप्रिल रोजी सीबीएससी शिक्षण प्रणाली आणि आधुनिक सुविधांनी युक्त खानवडी जिल्हा परिषद शाळेच्या लोकार्पण कार्यक्रमाने करावी अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या आहेत.

-----------------------------------------------

**NCMC स्मार्ट कार्ड**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने विविध सामाजिक घटकांसाठी प्रवास अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आलं आहे. ‘RuPay On-The-Go’, NCMC सक्षम स्मार्ट कार्ड योजनेचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आलं.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक देखील उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला तसेच विविध सवलतधारक प्रवाशांना आधार क्रमांकाशी संलग्न NCMC स्मार्ट कार्ड वितरित करण्यात येणार आहे. नवीन NCMC कार्डची किंमत १९९ रुपये इतकी निश्चित करण्यात आली आहे.

-----------------------------------------------

**अशोक खरात**

भोंदू अशोक खरातला नाशिक जिल्हा न्यायालयानं आज १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. खरातला पहिल्यांदा दाखल केलेल्या तक्रारीनुसार १४ मार्च रोजी

पोलिसांनी अटक केली होती. या गुन्हयातील पोलीस कोठडीची मुदत आज संपल्यानं त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं. दरम्यान, खरात याच्यावर दाखल दुसऱ्या गुन्हयात त्याला अटक करण्यासाठी नाशिक पोलीस उद्या कायदेशीर कारवाई करणार असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

-----------------------------------------------

**साधना सप्ताह**

भारत सरकार, क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने 2 एप्रिल ते 8 एप्रिल या कालावधीत 'साधना सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. देशातील शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आणि तंत्रज्ञानाची सवय आपल्या कामकाजात करुन त्यांना सक्षम करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

-----------------------------------------------

**विशेष आर्थिक क्षेत्र**

सेझ अर्थात विशेष आर्थिक क्षेत्रासाठी केंद्र सरकारने शुल्क सवलत जाहीर केली आहे. ज्या युनिटने ३१ मार्चला किंवा त्याआधी उत्पादन सुरू केलं आहे, त्यांच्यासाठीच ही सलवत लागू असेल असं महसूल विभागाने म्हटलं आहे. सवलत मिळण्यासाठी माल सेझमधल्या युनिटमधेच उत्पादित झालेला असावा तसंच त्यात २० टक्के मूल्यवर्धन झालेलं असावं, असंही यात म्हटलं आहे.

-----------------------------------------------

**राज्य मंत्रिमंडळ निर्णय**

राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत पर्यावरण, सिंचन, सामाजिक न्याय आणि दिव्यांगांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाबाबत सामाजिक न्याय विभागाच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळांन घेतला आहे. यामुळे आठवी ते बारावीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल. आज घेण्यात आलेल्या अन्य निर्णयांमध्ये महाराष्ट्र राज्य नदी पुनर्जीवन प्राधिकरण स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला. राज्यातील 54 नदी प्रदूषित पट्ट्यांबाबत पुनरुज्जीवन प्रकल्प राबविण्यात येणार आहे. अमरावती महापालिकेला क्रीडा

संकुलासाठी नवसारी इथल्या 16 हजार 708 चौरस मीटर जागा देण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे.

-----------------------------------------------

**आत्मसमर्पण**

काल ३१मार्च या नक्षल निर्मुलनासाठी ठरवल्या गेलेल्या शेवटच्या दिवशी छत्तीसगडमधील ९ नक्षल्यांनी गडचिरोलीत पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्यापुढे आत्मसमर्पण केलं. गडचिरोली जिल्ह्यात आता केवळ सहा सशस्त्र नक्षलवादी शिल्लक असून, जयराम गावडे हा एकमेव नक्षली गडचिरोली जिल्ह्याचा रहिवासी आहे, तर अन्य पाच जण छत्तीसगडमधील आहेत, असं नीलोत्पल यांनी सांगितलं.

जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी जयराम गावडे याच्या वडिलांशी चर्चा करून त्याला बंदुकीचा त्याग करून लोकशाहीचा मार्ग स्वीकारण्याचं आवाहन केलं आहे.

-----------------------------------------------

**समता सप्ताह**

अकोला जिल्ह्यासह राज्यात ८ ते १४ एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा केला जाणार आहे. या आठवड्यात संविधान मूल्यांचा प्रसार आणि सामाजिक न्यायाविषयी जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. या सप्ताहात अकोला जिल्ह्यातील प्रत्येक कुटुंबाला भारतीय संविधानाची प्रस्तावना वितरित करण्यासह महाविद्यालये, शाळा आणि आश्रमशाळांमध्ये व्याख्याने, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा, लघुनाट्ये आदी उपक्रमांचं आयोजन केलं जाईल. तसंच महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त मानवी हक्कांबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

-----------------------------------------------

**दिक्षाभूमी**

नागपूरच्या दिक्षाभूमी इथं डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त 14 एप्रिल रोजी सायंकाळी 6 वाजता प्रबोधन कार्यक्रमाच आयोजन करण्यात आल आहे. या कार्यक्रमात देशभरातील आंबेडकरी विचारवंत, तत्त्वज्ञानी आणि धम्म प्रशिक्षक उपस्थित राहून बाबासाहेबांच्या विचारांवर मार्गदर्शन करणार आहेत. आधुनिक राष्ट्रनिर्मिती, समाजाची दिशा आणि धम्माचा प्रसार या विषयांवर

विशेष चर्चा होणार असून नव्या पिढीने बाबासाहेबांचे विचार आत्मसात करावेत, अस आवाहन आयोजकांनी केल आहे.

-----------------------------------------------

**कृषी पुरस्कार मुदतवाढ**

सन 2025 - 26 या वर्षाकरिता विविध कृषी पुरस्कारांबाबत संगणक प्रणालीद्वारे अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे यांनी दिली आहे. या पुरस्कारांसाठी आता 15 एप्रिल पर्यंत अर्ज सादर करता येतील. कृषी डॉट महाराष्ट्र डॉट जीओव्ही या संकेतस्थळावर हे अर्ज भरता येऊ शकतात.

-----------------------------------------------

**वाघ हल्ला**

भंडाऱ्याच्या साकोली तालुक्यातील आमगाव बुद्रुक परिसरात वाघाने शेतात काम करत असलेल्या महिलेवर हल्ला केल्याची घटना घडली या परिसरातील गेल्या पंधरा दिवसात घडलेली ही तिसरी घटना आहे. यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात असून वनविभागानं उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

-----------------------------------------------

**अतिक्रमण**

मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेत राज्य शासनाने सुधारणा करून अंमलबजावणी अधिक कडक केली आहे. त्यामुळे अकोला जिल्ह्यात शेतरस्त्यांवरील अतिक्रमणे हटवण्याची प्रक्रिया वेगाने होणार आहे.शेतमाल वाहतुकीसाठी बारमाही रस्ते उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत असून, अतिक्रमणमुक्तीवर विशेष भर देण्यात आला आहे. अतिक्रमण करणाऱ्यांना तहसीलदारांकडून ७ दिवसांची नोटीस देण्यात येणार असून, त्या मुदतीत अतिक्रमण हटवले नाही तर प्रशासन थेट कारवाई करणार आहे

-----------------------------------------------

**आयपीएल**

इंडीयन प्रिमियर लिग- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनऊ सुपर जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. लखनऊ इथं संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरूवात होईल. काल झालेल्या सामन्यात पंजाब किंग्सनं गुजरात टायटन्सवर तीन गडी राखून विजय मिळवला.

-----------------------------------------------

**अपघात**

भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यात रोंघा गावात ६ आणि ७ वर्षांची दोन चिमुकले बेपत्ता झाल्यानंतर त्यांचे मृतदेह आज सकाळी पाण्याने भरलेल्या खड्ड्यात आढळून आले. आंघोळीसाठी गेलेल्या या दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने गावात शोककळा पसरली आहे.

-----------------------------------------------

**हवामान**

आज विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता आहे. अमरावती, वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जरी झाला असून इथं तशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची आणि गारपीट होण्याची शक्यता प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. याशिवाय नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, बुलढाणा, अकोला आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा आणि वादळ येण्याची शक्यता आहे. दरम्यान, अवकाळी पाऊस आणि वादळामुळे कमाल तापमानात घट नोंदवण्यात आली असून नागपुरात आज ३७ पूर्णांक ८ दशांश अंश इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

-----------------------------------------------